| Current Global Reviewer Peer Reviewed Journal | | ISSN- 2319-8648 |
| --- | --- | --- |
| Impact Factor - (IIJIF) – 2.143, सामाजिक क्रांतीचे प्रेरणास्थान : लहुजी साळवे | Nov. 2018 | Peer Reviewed Journal |

Impact Factor – 2.143 ISSN – 2319-8648

# Current Global Reviewer

Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**30th November 2018**

# 'सामाजिक क्रांतीचे प्रेरणास्थान : लहुजी साळवे'

मुख्य संपादक
अरुण बी. गोदाम

संपादक
डॉ. कहाळेकर सी.एम
लोकप्रशासन विभाग,
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड, जि. नांदेड

सहसंपादक
प्रा. डॉ. कुडकेकर एन. पी.
लोकप्रशासन विभाग प्रमुख,
संभाजीराव केंद्रे महाविद्यालय, जळकोट, जि. लातूर

सहसंपादक
प्रा. पवित्रे के. वाय.
समाजशास्त्र विभाग,
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड, जि. नांदेड

Shaury Publications

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 400/-



LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq. Biloli
Dist. Nanded.

Scanned by CamScanner

Current Global Reviewer Peer Reviewed Journal | ISSN- 2319-8648
Impact Factor - (IIJIF) – 2.143, सामाजिक कांतीचे प्रेरणास्थान : लहुजी साळवे | Nov. 2018 | Peer Reviewed Journal

40. लाहुजी साळवे एक क्रांतिवीर और समाजवीर के रूप में 102
प्रा.डॉ.शिवसर्जन टाले
41. असामान्य द्रष्टा समाजसुधारक :- लहूजी साळवे 104
प्रा.डॉ.वाघमारे भगवान शंकरराव
42. महान क्रांतीकारी, अद्यक्रांती गुरु लहुजी साळवे यांचे भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदान 107
डॉ.मंगनाळे संतोष कल्याणराव
43. क्रातीकारी लहुजी साळवे : एक दृष्टीक्षेप 111
प्रा.डॉ सुरेश धनवडे
44. सशस्त्र कांतीचे आद्यगुरू : कांतीवीर लहूजी साळवे 112
प्रा. लालबा चां. दुमटकर
45. लहूजी साळवे एक चिंतन 115
श्रीमती वैशाली पाटील
46. Promoter of Educationto The Untouchables:Krantiveer Lahuji Salve 117
**Kendre V.R.**
47. Lahuji Salve's Contributions to The Untouchables 119
**Dr.Kirtiratna B. Hatode**



LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq. Biloli
Dist. Nanded.
Scanned by CamScanner

Current Global Reviewer Peer Reviewed Journal
Impact Factor - (IIJIF) - 2.143, सामाजिक क्रांतीचे प्रेरणास्थान : लहुजी साळवे | Nov. 2018 | ISSN 2319 8648 | Peer Reviewed Journal

# क्रांतीकारी लहुजी साळवे : एक दृष्टीक्षेप

प्रा.डॉ सुरेश धनवडे
समाजशास्त्र विभाग प्रमुख , कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय शंकर नगर ता. ता. बिलोली जि. नांदेड

---

क्रांतीकारक लहुजी साळवे यांचा जन्म 14 नोव्हेंबर 1794 ला पुरंदर गडाच्या पायथ्याशी असलेल्या 'पेठ' या गावी झाला लहुजींच्या वडीलांचे नाव राघोजी साळवे व आईचे नाव विठाबाई होते. साळवे घराणे महाराष्ट्राच्या इतिहासात लढवय्ये म्हणून प्रसिद्ध होते. राघोजी साळवे शस्त्रातनिपुण, शरिरयष्टीने बापासारखे बलवान होते लहुजीचे पूर्वज आपल्या शुरवीरतेमुळे पराक्रमी घराणे म्हणून ओळखले जात होते. आपल्या पूर्व परंपरेनुसार बालपणीच लहुजींना सैन्याचे प्रशिक्षण वडीलांनी दिले होते. लहुजींना युद्ध कलेची चांगली आवड होती. लहुजीला एक खरी युद्धा बनविण्याच्या उद्देशाने शस्त्राची युद्धकलेची तालीम दिली त्यामुळे लहुजी दांडपट्टा फिरविणे, घोडयावर स्वारी , भालाफेक , बंदुक चालविणे तोफगोळा फेकणे, शस्त्राची गुप्त माहिती मिळविणे इत्यादी युद्धकलेत तरबेज होते. फक्त त्या काळात दलितांना लिहीण्या- वाचण्याची बंदी असल्यामुळे लहुजी साळवे फक्त शालेय शिक्षणापासून वंचित राहिले.

5 नोव्हेंबर 1817 ला पेशव्याचे इंग्रजा सोबत खडकी येथे भयानक युद्ध झाले 12 दिवस राघोजी व सळसळता तरुण रक्ताच्या 23 वर्ष वयाच्या लहुजी साळवेनी आपल्या मावळयांना सोबत घेऊन इंग्रजांविरुद्ध प्रखर लढा दिला. राघोजी साळवे या स्वातंत्र्य संग्रामात इंग्रजाच्या हातुन लहुजींच्या समोर शहीद झाले. पेशव्यांचा पराभव झाला या पराभवाने लहुजींच्या हृदयात स्वातंत्र्य प्राप्तीची ज्वाला भडकली स्वातंत्र्यप्रेम, देशभक्ती , देशप्रमाणे लहुजींना आपल्या वडीलांच्या दुःखातून सावरता आले भारत मातेला इंग्रजापासून वाचविण्यासाठी राघोजी साळवे शहीद झालेल्या ठिकाणी लहुजींनी 17 नोव्हेंबर 1817 ला आपल्या वडीलांना श्रध्दांजली अर्पण करीत 'मरेन तर देशासाठी आणि जगेन तर देशासाठी' अशी क्रांतीकारी प्रतिज्ञा करुन आपल्या वडीलांची समाधी उभारली.ज

आपल्या शुरवीर वडीलांचा मृत्यु व इंग्रजानी केलेला पराभव लहुजींना असह्य झाला पराक्रमी घराण्यातील लहुजींनी इंग्रजाना शिकस्त देण्यासाठी देशाच्या स्वातंत्र्यासाठी मावळयाशी नव्हे तर जहाल क्रांतीकारक निर्माण करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी आपल्या अंगी असलेले युद्ध कलाकौशल्याचे शिक्षण तरुणाना देण्यासाठी 1882 मध्ये रास्ता पेठ पुणे येथे देशातील पहिले तालीम युद्ध कलाकौशल्य प्रशिक्षण केंद्र सुरु केले या प्रशिक्षण केंद्रात सर्वच समाजातील युवक तालीम घेण्यासाठी येऊ लागले. यात प्रामुख्याने महात्मा फुले, वासुदेव फडके, क्रांतीभाऊ खरे, क्रांतीवीर नाना दरबारे, नाना मोरोजी, उमाजी नाईक लहुजी साळवे यांच्या आखाडयात शिकले.

लहुजी साळवे या मराठा क्रांतीकारी युग पुरुषाबद्दल सतिश गाढे म्हणतात घराघरामध्ये लहुजी साळवे यांचे विचार गेल्यास सशक्त भारताची निर्मिती होणार आहे. तर युवकांना त्यांच्या विचाराने दिशा मिळणार असल्याचे सांगुन वीर लहुजी साळवे यांच्या विचाराने दिशा मिळणार असल्याचे सांगुन वीर लहुजी साळवे यांच्या संगमवाडी जि. पुणे येथील समाधीसाठी स्मारकाचे काम मार्गी लावण्यासाठी एकजुटीने शासन स्तरावर पाठपुरावा करण्याचे आव्हान केले.

लहुजी साळवे यांनी आपल्या काळी सत्य सांगु इच्छिणाऱ्यांना संरक्षण दिले पण त्यांच्या कार्यांनी आज समाजाला फारशी जाणीव नाही असे मत 86 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे निर्वाचीत अध्यक्ष डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी व्यक्त केले. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समता परिषदे तर्फे कोत्तापल्ले यांना रिपब्लीकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्या हस्ते क्रांतीगुरु लहुजी साळवे पुरस्कार पुरस्कार प्रदान करण्यात आला. कोत्तापल्ले यांच्या मते 19 वे शतक परखोपित पर्यायी आव्हान देऊन नव्या जाणीवा घडवणारे होते पण समाजाच्या जडणघडणीसाठी पायाभुत ठरलेल्या महापुरुषाच्या इतिहासाच आपल्याकडे उपलब्ध नाही लहुजींचे चरित्र लिहीले गेले पाहिजे कारण त्या क्रांतीगुरुच्या कार्याची प्रेरणा देऊन समाजातील तरुण वर्ग देशील प्रेरीत होऊन समाज परिवर्तनासाठी चांगले कार्य करु शकेल यात शंकाच नाही. लहुजी साळवे सारखी एखादी महान व्यक्ती देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतः सर्वस्व अर्पण करते त्याबद्दल काही पुरावे सुध्दा उपलब्ध होतात.

या सर्व बाबी विचारात घेता लहुजी साळवे यांच्या जीवनाचा आणि त्यांच्या विचाराचा आदर्श आजच्या पुढे यांच्या सामाजिक, शैक्षणिक क्रांतीचे सरक्षक म्हणूनच ते क्रांतीकारी समाज सुधारक होते असा आदर्श नव्या पिढीसमोर ठेवणे आवश्यक आहे जेणेकरुन आजची नवी पिढी ही जुन्या बोळभट रुढी प्रिय संकल्पनाचा त्याग करुन नवनिर्माण नव्या समाज परिवर्तनाच्या नव पिढीत एक सामाजिक बांधिलकीने समाज निर्माणासाठी पुढे येऊ शकेल

LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq. Biloli
Dist. Nanded.

Scanned by CamScanner

पेशवाईच्या काळात इ.स. 14 नोव्हेंबर 1794 मध्ये वस्ताद लहुजी बुंवाचा जन्म झाला. साळवे घराण्यानुसार त्यांचे नाव लहुजी ठेवण्यात आले लहुजींचे बालपण हे खेळणे खेळण्यात नव्हे तर तलवार, कटयार, खंजर, पट्टा सारखे शस्त्र खेळण्यात गेले. ज्या प्रमाणे आजच्या लहान मुलांना प्लास्टीकचे खेळणे घेऊन दिले जाते. परंतु लहुजीचा छंद हा वेगळा होता. त्यांचे वडील राघोजी पराक्रमी व बलवान पुरुष होते. ते वाघासोबत लढत असत. त्यामुळे त्यांना 'नरव्याघ्र' ही म्हटल्या जात असे.

दुसरे बाजीराव पेशवे यांनी राघोजीची ही ताकद पाहुन आपल्या शिकारखान्यातील हिंस्त्र पशुच्या देखभाल करण्यासाठी नियुक्त केले. परंतु राघोजी निशानेबाज व शुर पुरुष होते. त्यावेळी निशानेबाजी करणारे राघोजी पहिले व्यक्ती होते. पण एका अस्पृश्यांने सैनिकी पेशात राहावे हे व्यवस्थेच्या विरोधात होते. पुरातन शास्त्राच्याप्रमाणे सत्ता, शिक्षा आणि धन हया तीन गोष्टी उच्चवर्णियाच्या हातामध्ये होत्या अस्पृश्यांनी त्याचा उपयोग करणे पाप समजल्या जाई म्हणुन राघोजी श्वापदाच्या सेवेमध्ये कार्यरत राहिले.

**विषय प्रवेश :-**

**पराक्रमी साळवे घराणे:**

सुर्याची किरणे जमीनीवर पडण्यापुर्वीच राघोजीची दिनचर्या सुरु होत असे. लहानशा लहुजीला घोडयावरती बसवुन ते शिकारखान्याकडे प्रस्थान करीत असत. त्यामुळेच हिस्त्रपशुंची लहुजीना बालवयातच ओळख होती. लहुजी सात वर्षाच्या वयातच घराच्या अंगणात तिरंदाजी, मल्लखांब आणि दंडपट्टा शिकु लागले. पुरंदरच्या परिसरातुन वाहणारी मुळा-मुठा नदीच्या पाण्यात लहुजींनी पोहणे शिकले.

साळवे घराण्यात एक कला प्रसिध्द होती ती म्हणजे पाठीच्या आणि पोटाच्या साहयाने भिंत चढणे, राघोजी हया कलेत प्रसिध्द होते पण ही कला असाध्य ही होती. लहुजींना ही कला अवगत झाली होती. शिवाजी महाराजांच्या काळात किल्ला सर करण्याकरीता घोरपड नावाच्या प्राण्याचा उपयोग केला जात असे घोरपडीच्या कमरेला दोन बांधुन किल्ला चढल्या जात असे. साळवे घराण्याची दुसरी महत्वपुर्ण कला म्हणजे नदीच्या पुराच्या पाण्यातुन डुबकी लावुन दोन- दोन फर्लांग अंतर पाण्यामधुन पोहत जाणे आणि तेवढया वेळेपर्यंत आपला श्वास रोखुन ठेवणे हे मृत्युला निमंत्रण देणारी कला होती. लहुजींना हया सर्व कला आणि शस्त्रविद्या शिकण्यामागे त्यांचे वडील राघोजीची महत्वपुर्ण भुमिका होती.

लहुजी शरीराने धष्टपुष्ठ आणि बांधेसुद होते. बारावर्षाच्या काळातच त्यांचे वेगळे व्यक्तीमत्व दिसत होते. रस्त्याने जाणारी येणारी मंडळी त्यांना अभिवादन केल्याशिवाय राहत नसत. म्हणुनच श्रीमंत पेशव्याचे इथे लहुजीला नाकेदाराची नोकरी मिळाली होती. 'रामोशी गेट' ही त्यांची पहिली निवड होती.

लहुजी पेशव्याकडे नोकरी करुन सुखी आणि संतुष्ठ नव्हते कारण त्यावेळी जातीयतेचा प्रभाव फार मोठया प्रमाणावर होता. विषमतावादी समाज व्यवस्थेला मजबुत करण्यासाठी सनातनी प्रवृत्या कठोर होत्या. दुसरा बाजीराव पेशवा एक जुलमी राजा म्हणुन ओळखल्या जात असे. जनताही त्यांच्या आत्याचाराला कंटाळली होती. सामान्य माणसांना त्यांच्या हक्कापासुन परावृत्त केलया जात असे. आज ही भारताला स्वातंत्र्य मिळाले असले तरी त्यांचे अनुकरण अस्पष्टपणे केल्या जात आहे कधी- कधी तर संपुर्ण बहुजनांच्या अधिकाराचे एकमेव शस्त्र म्हणजे 'भारतीय संविधान' याला बदलविण्याची भाषा केली जाते. बाजीरावांच्या काळात तर अस्पृश्याची सावली सवर्णावर पडु नये असा दंडक होता. त्यांना पिण्याच्या पाण्यासाठी किती तरी वेळ विहीरीवर थांबाव लागत होत. कधी- कधी तर तलाने मुले त्यांच्या मृत्युही होत असे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अस्पृश्यांना नाकाबंदीच होती.

लहुजींकडे तोफेसारखी शस्त्र सोडली तर सगळया प्रकारचे प्राचीन आणि आद्य शस्त्र होते. हयांचे प्रशिक्षण दिल्या नंतर या बहादुरांची ते परिक्षा घेत असत. हे सर्व कार्य घाटी मध्ये होत असत. जो बहादुर प्रशिक्षण कार्यकाळात प्राविण्या प्राप्त करीत असे लहुजी त्याला दोन्ही हातानी उचलुन 'भले बहादुर' म्हणत असत. इंग्रजी सत्तेला शह देणे हे काही शंभर दोनशे मातंग समाजाच्या युवकांचे काम नव्हते. ही बाब समोर ठेवुन अन्य अस्पृश्य जातीचाही विचार केला. त्यानी शेकडो मांग रामोशी आणि अन्य जातीच्य तरुण युवकांना प्रशिक्षित करुन सशस्त्र क्रांतीकारी निर्माण करण्याचा निर्णय घेतला. क्रांतीकारी निर्माण करण्याचा महाराष्ट्राचा नव्हे तर देशातील तो पहिला 'कारखाना' च होता ते एक गुप्त विद्यापीठ होते.

महाराष्ट्रामधील पुणे शहर म्हणजे ब्राम्हणवादाचा बाले किल्ला समजल्या जात होता. जिथे एका अतिशुद्र मातंग जातीच्या व्यक्तीने व्यायामशाळा (आखाडा) सुरु करावी म्हणजे ती एक सामाजिक क्रांतीचा पाया होता. 1822 मध्ये वस्ताद लहुजीनी गंजपेठेत आखाडा निर्माण केला. आखाडयाच्या वास्तुजवळ विहीरीचे बांधकाम केले होते. कारण अस्पृश्यांना स्पृश्याच्या विहीरीवर पाणी भरण्याची मनाई होती. महानुभव पंथाचे महापुरुष चक्रधर स्वामी यांचे गुरु गोविंदप्रभु यांनी त्यावेळी पाण्यासाठी तडफडणाऱ्या मातंगाना आव्हान केले होते. कि तुम्ही दुसऱ्यावर विसंबुन राहु नका. तुमची गरज तुम्ही पुर्ण करा. सर्व मिळुन विहीर खोदा आणि पाण्याची गरज पुर्ण करा मी तुमच्या मागे आहे. आजही ती भव्य विहीर मातंग विहीर म्हणून ओळखल्या जाते अमरावती जिल्हयातील मोशीजवळील सिध्दपुर जवळ लोकमार्गाच्या

LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq, Biloli
Dist. Nanded.

Scanned by CamScanner

Current Global Reviewer Peer Reviewed Journal
Impact Factor - (IIJIF) – 2.143, सामाजिक कांतीचे प्रेरणास्थान : लहुजी साळवे | Nov. 2018 | ISSN- 2319-8648 | Peer Reviewed Journal

बाजुला ती पाहावयास मिळते. एक ऐतिहासिक स्थळ आहे. त्याच प्रमाणे लहुजीचा आखाडा एक ऐतिहासिक वास्तु असून ती वास्तु पुणा महानगरपालिकेच्या देखरेखीत आहे.

लहुजी एक अस्पृश्य जातीत जन्मलेले व्यक्ती त्या काळात जातीयतेचे धैमान नाचत होते. शिक्षण किंवा विद्या आणि शस्त्रधारण करणे हे धर्मवेदाच्या विरोधात होते. ज्या प्रमाणे शंबुकाने ज्ञान प्राप्त केले तर त्याचा शिरच्छेद करण्यात आला एकलव्याने धर्नुविद्या प्राप्त केली तर गुरुदक्षिणेच्या स्वरुपात त्याला आपला जीव गमवावा लागला. कारण तो शुद्र होता हा इतिहास वाचकांना माहित आहेच

1822 मध्ये लहुजीनी सुरु केलेल्या अखाडयामध्ये उद्‌घाटन पुण्याचे नामांकित व्यक्ती रास्ते सरदार यांच्या हस्ते आले त्या वेळी लहुजीनी आपल्या सर्व कलांचे प्रदर्शन केले. दांडपट्टयाच्या प्रात्याक्षिकाने तर रास्ते सरदार प्रभावित झाले आणि त्यांनी शाबासकी दिली ह्या कार्यक्रमाला मोठया संख्योने लोक उपस्थित होते. हयामुळे पुर्णा आणि आसपासच्या क्षेत्रात लहुजीच्या नावाची चर्चा होऊ लागली होती.

वस्ताद लहुजी म्हणजे सशस्त्र क्रांतीचे अध्यापक ते आपले शिष्यांना प्रशिक्षण देते वेळी त्यांचे मनोबल वाढवून शस्त्रविद्यमध्ये तरबेज करीत असत. लहुजी आपल्या शिष्यांना आखाडे बहादुर नावाने संबोधीत असत. त्यांना शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची जाणीव करुन देत असत. त्यामुळे त्यांच्या तालिमीत केवळ मातंग समाजाचेच युवक नाही तर भिल्ल, पारधी, चांभार महार, लोहार,वडार, डोंबारी, कोलाम, माळी , कुणबी आदी जाती जमातीचे लोक प्रशिक्षण घेत होते. उच्चवर्णीय व्यक्ती लहुजीच्या आखाडयात येणे असंभव होते. परंतु मातंग आणि रामोश्याची संख्या जास्त प्रमाणात होती. रात्रदिवस एक करुन भारताला विदेशी गुलामीतुन स्वतंत्र करण्यासाठी क्रांतीकारी निर्माण करणे हा एकमेव, उद्देश लहुजीचा होता म्हणुन सशस्त्र प्रशिक्षणामागे भारताची स्वतंत्रता ही त्यांची अभिलाषा होती. (द्रोणाचार्यांसारखी गुरुदक्षिणा नव्हे) लहुजी उच्च प्रतिचे प्रशिक्षणाबरोबरच स्वातंत्र्य मिळविण्याचे विचारही ते देत असत.

संदर्भ सुची :-

1) अंकुश सिंदगीकर - लहुजी साळवे आणि मांतग समाज, रुद्रायणी प्रकाशन औरंगाबाद
2) खुशाल खडसे- आद्यक्रांतीगुरु वस्ताद लहुजी साळवे - नेहा प्रकाशन 120ग्नानक पुरा नागपुर 17
3) करुणेश डोलारे- महाराष्ट्रातील आदयक्रांतीगुरु वस्ताद लहुजी साळवे आणि समाज - प्रतिष्ठाण प्रकाशन पुणे
4) त्रिभुवन आर.के. -बहुज नायक क्रांतीवीर लहुजी, साप्ताहीक औरंगाबाद

LECTURER
ART'S COMM. & SCI. COLLEGE
Shankarnagar, Tq, Biloli
Dist. Nanded.

Scanned by CamScanner